सत्यमेव जयते

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

महाराष्ट्र शासन
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,
बहिरट पाटील चौक, शिवाजी नगर, पुणे - ४११ ०१६

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ३५०

दूरध्वनी क्र. (०२०) २५६५६२३४/२५६५७१७६ Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

**महत्वाचे /तात्काळ**

जा. क्र. : तंशिविकापु/शै.वि-५/क्रीडास्पर्धा/२०२४/ 21
दिनांक : - 2 JAN 2024

**परिपत्रक**

प्रति,
संचालक/प्राचार्य,
या कार्यालयाचे अधिनस्त सर्व शासकीय व अशासकीय अनुदानित संस्था,
**(पुणे विभाग).**

प्रति,
उपसचिव,
महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, पुणे

**विषय : पुणे विभागीय क्रीडास्पर्धांचे (खेळांचे) आयोजनाबाबत..**

**संदर्भ :** या विभागीय कार्यालयाचे परिपत्रक क्र. तंशिविकापु/शै.वि-५/क्रीडास्पर्धा/२०२३/ ५८५१ दिनांक : २१.१२.२०२३.

उपरोक्त विषयास अनुसरुन या विभागीय कार्यालयांच्या अंतर्गत येणाऱ्या सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित संस्थाप्रमुख व कार्यालय प्रमुख यांना कळविण्यात येते की, अधिकारी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना रोजच्या कामाच्या तणावामधून मुक्ती, शारीरीक व मानसिक तंदुरुस्ती वाढावी तसेच त्यांच्यामध्ये संघभावना वृध्दींगत व्हावी या हेतुने मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय मुंबई, यांच्या संकल्पनेतुन व मा. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली **शुक्रवार, दिनांक १९ जानेवारी, २०२४ रोजी कराड येथील ०३ शासकीय संस्थांमध्ये सदर क्रीडास्पर्धा शासकीय, अशासकीय अनुदानित संस्थेमधील/कार्यालयातील नियमित कार्यरत असलेल्या शिक्षक व शिक्षकेत्तर अधिकारी/कर्मचारी यांचेसाठी आहे.**

क्रीडास्पर्धा कार्यक्रमाचे स्वरुप, तसेच सांघिक व वैयक्तिक खेळांचा समावेश अशा सर्व क्रीडास्पर्धा तसेच पुरुष व महिला अधिकारी/कर्मचारी यांचे साठी आहेत. क्रीडास्पर्धे बाबतची नियमावली तयार करण्यात आलेली असून, खालीलप्रमाणे आहे.

**उद्घाटन व इतर कार्यक्रम :-**

१. क्रीडास्पर्धा उद्घाटन समारंभ .
२. एन. बी. ए. व नॅक मानांकन प्राप्त संस्थांचा गुणगौरव व सत्कार.
३. दिनांक १ जानेवारी २०२३ ते ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत शासकीय सेवेतून नियत वयोमानानुसार सेवानिवृत झालेल्या अधिकारी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचा सत्कार.
४. अधिकारी, शिक्षक व शिक्षकेत्तर सांस्कृतिक कार्यक्रम.
५. क्रीडास्पर्धा समारोप व बक्षिस वितरण कार्यक्रम.

**क्रीडास्पर्धेबाबत नियमावली :-**

१) क्रीडा स्पर्धेत क्रिकेट, व्हॉलीबॉल, टेबल टेनिस, कॅरम, बुध्दीबळ, बॅडमिंटन, रनिंग, व रस्सीखेच हे क्रीडाप्रकार आहेत.
२) सदर स्पर्धा ही केवळ शासकीय सेवेतील कायमस्वरुपी कार्यरत अधिकारी व कर्मचाऱ्यांकरीता असून, प्रत्येक खेळाडूकडे संबंधित संस्थेचे ओळखपत्र असणे आवश्यक आहे.

३) स्पर्धेमध्ये सहभागी होणाऱ्या स्पर्धकांची माहिती सोबत दिलेल्या नमुन्यामध्ये भरून संस्थाप्रूखांच्या मान्यतेसह gceksport22@gmail.com या ई मेल आयडीवर खालील दिलेल्या नमुन्यामध्ये सर्व माहिती भरुन संस्थाप्रमूखाच्या **मान्यतेसह दि. ०८.०१.२०२४ रोजीपर्यंत विनाविलंब पाठविण्यात यावी.** यानंतर आलेली माहिती/नावे ग्राह्य धरली जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**(माहिती पाठविण्याचा नमुना)**

तंत्रशिक्षण संचालनालय अंतर्गत विभागीय क्रीडास्पर्धा (पुणे विभाग) शै.व.२०२४.

**संस्थेचे नाव :**

**समन्वयकाचे नाव व फोन नंबर :**

**खेळाचा प्रकार :**

| अ. क्र. | खेळाडूचे नांव | जन्मतारीख | सेवार्थ ID | मोबाईल नं. |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |

**(याप्रमाणे प्रत्येक खेळाचा प्रकार व खेळाडूंची यादी तयार करावी.)**

**त्यासोबत खालील माहिती भरुन देणे.**

| एकूण पुरुष खेळाडूंची संख्या | एकूण महिला खेळाडूंची संख्या | एकूण खेळाडू संख्या |
|---|---|---|
| | | |

**संस्थाप्रमूखांची सही व शिक्का**

४) स्पर्धेदरम्यान पंचांचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील. पंचांशी वाद घातलेस संघास/खेळाडूस स्पर्धेतून बाद करण्यात येईल.

५) स्पर्धेतील प्रत्येक क्रीडा प्रकाराकरीता कमीत कमी चार संघ/खेळाडू असल्याखेरीज सदरची स्पर्धा घेण्यात येणार नाही.

६) स्पर्धेतील सर्व सामने हे बाद पध्दतीने खेळविण्यात येतील.

७) खेळासंदर्भात कुठल्याही तक्रारीबाबत संयोजन समितीचा निर्णय अंतिम राहील.

८) सर्व खेळानुरुप ड्रेसकोड अभिप्रेत आहेत. बॅडमिंटनसाठी बॅडमिंटन शुज अनिवार्य आहेत.

९) ज्या खेळासाठी बॅट व रॅकेटची आवश्यकता असेल ती संबंधीत सहभागी खेळाडूंनी स्वतः आणावयाच्या आहेत.

१०) खेळाडूंना स्पर्धेत सहभागी होण्याकरीता कोणत्याही प्रकारचा प्रवासभत्ता अथवा मानधन देय राहणार नाही.

११) सर्व संघांनी व खेळाडूंनी खेळाच्या नियमांचे व शिस्तीचे पालन करावे.

१२) **संस्थानिहाय प्रत्येक खेळासाठी सहभागी खेळाडुंच्या संख्येची कमाल मर्यादा पुढीलप्रमाणे आहे. संस्थांनी संबंधित खेळासाठी स्पर्धा समितीने विहीत केलेल्या खेळाडूंच्या संख्येच्या मर्यादेमध्ये नावे पाठवावी.**

| **अ.क्र.** | **खेळाचे नांव/प्रकार** | **खेळाडूंची कमाल मर्यादा** |
|---|---|---|
| १. | क्रिकेट | १५ खेळाडू (एक संघ) (पुरुष व महिला) |
| २. | व्हॉली बॉल | १० खेळाडू (एक संघ) (पुरुष व महिला) |
| ३. | टेबल टेनिस | ०४ खेळाडू (प्राधान्याने ०२ महिला खेळाडू) |
| ४. | कॅरम | ०४ खेळाडू (प्राधान्याने ०२ महिला खेळाडू) |
| ५. | बुध्दीबळ | ०४ खेळाडू (प्राधान्याने ०२ महिला खेळाडू) |
| ६ | बॅडमिंटन | ०४ खेळाडू (प्राधान्याने ०२ महिला खेळाडू) |
| ७. | रनिंग १०० मीटर- खुला गट | १०० मीटर- ०४ खेळाडू (पुरुष व महिला) |
| | | ४०० मीटर- ०४ खेळाडू (पुरुष व महिला) |
| ८ | रस्सीखेच | १० खेळाडू (एक संघ) |

१३) सर्व खेळाडूंनी स्वतःचे ओळखपत्र स्पर्धे दरम्यान धारण करावे.
१४) क्रिकेट स्पर्धा ०८ षटकांची खेळवण्यात येईल व अंतिम सामना १० षटकांचा असेल.
१५) एका गोलंदाजास जास्तीत जास्त ०२ षटके टाकता येतील.
१६) खेळासंदर्भात कुठल्याही तक्रारीबाबत संयोजन समितीचा निर्णय अंतिम राहील.

**(क्रीडास्पर्धेविषयी अधिक माहितीकरीता श्री. राजेश गायकवाड मो. नं. ९१७५२०८२३३, श्री. राहूल जाधव मो. नं. ९६७३३३५७१२,श्री. राम तांबडे मो. नं. ८८०५४९८९२९, व श्रीमती. पुष्पा खाडे मो. नं. ८८५६८०६३२८ या क्रीडा समिती सदस्यांच्या मोबाईल नंबरवर कॉल व व्हॉट्अॅपद्वारे संपर्क करावा.)**

या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित संस्थाप्रमुख व कार्यालय प्रमुख यांना सूचित करण्यात येते की, वर नमूद केलेल्या क्रीडा प्रकारात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या सर्व अधिकारी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची नावे नोंदवून दिलेल्या नमून्यामध्ये भरुन gceksport22@gmail.com या ई मेल आयडीवर **दिनांक ०८.०१.२०२४ पर्यंत** विनाविलंब सादर करण्यात यावी व सहभागी होण्याबाबत आवश्यक त्या सूचना देण्यात याव्यात.

**(डॉ.द.व्यं.जाधव)**
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रतः प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.